हिं दु बो ध
॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः


■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०५ ■ ऑगस्ट २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या २८

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 05 ■ August 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 28




# शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी, आता मदत जनता बँकेची!



## जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजना

शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज

| देशांतर्गत शिक्षणासाठी | परदेशी शिक्षणासाठी | आकर्षक |
| --- | --- | --- |
| ₹50* लाख | ₹1* कोटी | व्याजदर |

*अटी व नियम लागू

## जनता सहकारी बँक लि., पुणे

मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.jsblpune.bank.in

मासिक
**हिंदुबोध**
**वर्ष – सव्वीसावे : अंक ५ वा**
शके १९४८
**ऑगस्ट २०२६**

**संपादक**
**श्री. रविकांत कळंबकर**
ravi.kalambkar@gmail.com

**निवास**
**एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४**

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

**संपादक मंडळ**
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

**संपादक मंडळ सदस्य**
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

**पत्र व्यवहार**
**व्यवस्थापक**
**मनोज शेलार**
**मो: ९०४९३९६३६३**

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

**मुद्रण स्थळ**
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

# अनुक्रमणिका

- संपादकीय.... शौर्य, संकल्प आणि समृद्धीचे अथांग पर्व....
  श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी .................... ०५
- वि. हिं. परिषद प्रांत वृत्त .................... ०७
- अमीर खान चे तिसरे लग्न
  कुमार आठवले .................... २१
- संस्कृत दिन – भाषा संस्कृतीच्या वारसाची
  ॲड. स्वाती जेरे .................... २२
- भारत : एक अजिंक्य महासत्ता
  श्रीपाद रामदासी .................... २३
- भारतीय आर्थिक क्रांतीचे एक तप
  मयुरी रामदासी .................... २५

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## हे राष्ट्र देवतांचे

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आ–चंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे
कर्तव्यदक्ष भूमी सीता–रघुत्तमाची
रमायणे घडावी येथे पराक्रमांची
शिर उंच उंच व्हावे हिमवंत पर्वतांचे
येथे नसो निराशा थोड्या पराभवाने
पार्थास बोध केला येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला गीताख्य अमृताचे
येथेच मेळ झाला सामर्थ्य–संयमाचा

येथेच जन्म झाला सिद्धार्थ गौतमाचा
हे क्षेत्र पुण्यदायी भगवन् तथागताचे
हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे
सत्यार्थ झुंज द्यावी या जागत्या प्रथेचे
येथे शिवप्रतापी नरसिंह योग्यतेचे
येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जनशासनातळीचा पायाच 'सत्य' आहे
येथे सदा निनादो जयगीत जागृताचे

– ग.दि.माडगूळकर

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

| | | |
|---|---|---|
| **श्री. रविकांत कळंबकर** | **श्री. किशोर चव्हाण** | **श्री. पांडुरंग राऊत** |
| (संपादक) | (प्रांत मंत्री) | (प्रांत अध्यक्ष) |

# शौर्य, संकल्प आणि समृद्धीचे अथांग पर्व भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन

संपादकीय

**जय हिंद! वंदे मातरम!**

१५ ऑगस्ट २०२६. आज आपली भारतमाता स्वतंत्र, सार्वभौम आणि सामर्थ्यशाली देश म्हणून आपल्या गौरवशाली प्रवासाचे ८० वे वर्ष साजरी करत आहे. राजधानी दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून जेव्हा तिरंगा अवकाशात डौलाने फडकतो आणि २१ तोफांचा ऐतिहासिक गडगडाट जन–गण–मनच्या स्वरांशी एकरूप होतो, तेव्हा १४० कोटी भारतीयांच्या अंगावर रोमांच उभे राहतात. हा केवळ कॅलेंडरवरील एक दिवस नाही; हा सोहळा आहे त्या असीम त्यागाचा, शौर्याचा, आणि पारतंत्र्याच्या अंधकारी विवरातून अजिंक्यत्वाकडे झेप घेणाऱ्या एका अजिंक्य राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा!

यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनाला एक अद्भुत आणि पवित्र ऐतिहासिक संदर्भ लाभला आहे. ज्या 'वंदे मातरम' या महामंत्राने क्रांतीची धगधगती मशाल पेटवली, ज्याच्या एका घोषाने हजारो देशभक्तांना फासावर जाताना हसतमुख केले, त्या आपल्या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला यंदा ११५ वर्षे पूर्ण होत आहेत. दीडशे वर्षांपूर्वी पेटलेली ही राष्ट्रभक्तीची ज्योत आज ८० व्या स्वातंत्र्यदिनी प्रत्येक भारतीयाच्या हृदयात एका नव्या ऊर्जेसह धगधगत आहे.

## आहुत्यांनी रचला पाया : हुतात्म्यांना मानाचा मुजरा

आज आपण ज्या मोकळ्या हवेत श्वास घेत आहोत, तिची किंमत आपल्या पूर्वजांनी स्वतःच्या रक्ताने चुकवली आहे. चापेकर बंधू, वासुदेव बळवंत फडके, मंगल पांडे, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्यासारख्या क्रांतिकारकांचे बलिदान; स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अंदमानातील अमानुष कष्ट; आणि डॉ. आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल,  यांच्यासारख्या राष्ट्रपुरुषांचे नेतृत्व, राजर्षी शाहू, फुले दाम्पत्य, आगरकर यांच्यासारख्या समाजसुधारकांचे ज्वलज्वलंत विचार... या सर्वांच्या तपस्येतून आजचा स्वतंत्र भारत उभा आहे.

आज प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे– ज्या देशासाठी आपल्या पूर्वजांनी प्राण दिले, त्या देशाला आपण काय देत आहोत? आज सीमेवर बर्फात पाय रोवून उभा असलेला भारतीय सैनिक आणि अथांग सागराचा तळ राखणारा नौदल जवान ज्या निष्ठेने देशाचे रक्षण करतो, तीच निष्ठा आपल्या दैनंदिन जीवनात देशाप्रती असणे हीच खरी देशभक्ती आहे.

स्वातंत्र्याची ही आठ दशके भारताच्या आत्मविश्वासाच्या साक्ष आहेत. एकेकाळी पाश्चात्य जगाने भाकीत केले होते की, भारत देश आपल्या विविधतेमुळे विखुरला जाईल. परंतु, आज भारताने त्या सर्व शंकांचे तुकडे करत जगाला दाखवून दिले आहे की, विविधता ही आपली कमजोरी नसून आपली सर्वात मोठी ताकद आहे.

आजचा भारत हा केवळ 'याचिका' करणारा देश राहिलेला नाही, तर तो जगाला 'दिशा' दाखवणारा विश्वबंधू बनला आहे.

आर्थिक रणसंग्राम: जगातील प्रमुख अर्थव्यवस्था मंदीच्या सावटाखाली असताना, भारतीय अर्थव्यवस्था ५ व्या स्थानावरून ३ री सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या उंबरठ्यावर ताठ मानेने उभी आहे.

विज्ञानाचे अथांग आकाश: चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर तिरंगा फडकवणारा भारत आता 'गगनयान' आणि 'शुक्रयान'च्या माध्यमातून अंतराळावर आपले नाव कोरणार आहे.

संरक्षणाचे पोलादी कवच: राफेलची गर्जना, आयएनएस विक्रांतची सागरझेप आणि ब्रह्मोसचा थरकाप यांमुळे आज शत्रू भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे धाडस करू शकत नाही.

आज २०२६ च्या या ऐतिहासिक टप्प्यावर उभे असताना आपल्यासमोर केवळ भूतकाळाचे गौरवगान करण्याचे उद्दिष्ट नाही, तर भविष्याचे सुवर्णपान लिहिण्याचे आव्हान आहे. भारत आज 'विकसित भारत २०४७' च्या महासंकल्पाकडे पावले टाकत आहे. जेव्हा आपला देश स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करेल, तेव्हा तो केवळ लोकसंख्येने मोठा नसेल, तर ज्ञान,

विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांमध्ये जगाचा 'विश्वगुरू' असेल.

हा संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला प्रांतीयता, भाषावाद आणि जातीभेदाच्या भिंती पाडाव्या लागतील. जेव्हा १४० कोटी नागरिक 'राष्ट्र प्रथम, सदैव प्रथम' (Nation First, Always First) या एकाच मंत्राने प्रेरित होऊन काम करतील, तेव्हा भारताला जगातील सर्वोच्च स्थानी पोहोचण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

'हर घर तिरंगा' ही आता केवळ एक मोहीम राहिलेली नाही, ते एक जनआंदोलन झाले आहे. आज देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यात डौलाने फडकणारा तिरंगा हा आपल्या एकतेचा आणि अखंडतेचा पुरावा आहे. हा तिरंगा आपल्याला सांगतो की, आपण प्रथम भारतीय आहोत आणि नंतर बाकी काही! आणि म्हणूनच आपण अभिमानाने म्हणूयात  तिरंगा घराघरांत, भारत मनामनांत !

स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र दिवशी लाल किल्ल्यावरून येणाऱ्या देशप्रेमाच्या सुरांशी आपले सूर जुळवूया. या मातीशी इमान राखण्याची, आणि भारताला परमवैभवाकडे नेण्याची प्रतिज्ञा करूया. स्वातंत्र्यदिनाचा हा अमृतमयी सोहळा आपल्यात राष्ट्राभिमानाची एक नवीन ज्योत जागवून जावो!

स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतीवीरांना आणि देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र सज्ज असणाऱ्या वीर जवानांना 'हिंदुबोध परिवारातर्फे कोटी-कोटी प्रणाम!'

स्वातंत्र्यदिनाच्या समस्त देशवासियांना हार्दिक शुभेच्छा!

**भारत माता की जय! वंदे मातरम!**

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**



## प्लास्टिक मुक्तआषाढी वारी सेवा प्लास्टिक संचलन अभियान

**विश्व हिंदू परिषद – येरवडा भाग**

आषाढी वारी निमित्त (विश्रांतवाडी ते संगमवाडी) पालखी मार्गावर विश्व हिंदू परिषदेच्या वतीने प्लास्टिक संकलन, स्वच्छता अभियान, पर्यावरण जनजागृत वारीचे पावित्र्य, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन समतोल राखण्यासाठी . येरवडा भागातील विश्रांतवाडी प्रखंड ते संगमवाडी खंडापर्यंत प्लास्टिक संचलन अभियान राबवण्यात आले या अभियानात मुख्यता मातृशक्ती दुर्गा वाहिनी बजरंग दल आयाम कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला वारी यावेळेस विश्व हिंदू परिषद धर्माचार्य महासंघ तर्फे ५० रेनकोट व स्थानिक सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई अग्रवाल यांच्या मार्फत ३५० रेनकोट एकूण ४०० रनकोटचे वाटप विजय कांबळे पूर्व विभाग सहमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

विश्रांतवाडी ते संगमवाडी पर्यंत प्लास्टिक संचलन करण्यासाठी प्रखंडातील कार्यकर्ते विश्रांतवाडी मध्ये प्लास्टिक संचलन अभियान करत रेनकोट वाटप करण्यात आले. प्लास्टिक कचरा कोणी महानगरपालिका व पुना स्वच्छता सेवक यांच्या कचरा वाहतूक विभाग देण्यात आला.

येरवडा भागा वरील कार्यकर्त मुकेश जी गोएल जिल्हाध्यक्ष श्री हनुमंत खांदवे जिल्हा मंत्री मयूर धोत्रे जिल्हा बजरंग दल संयोजक, श्री.गणेश तारू जिल्हा गोरक्षक, कविताताई निखाडे जिल्हा मातृशक्ती, सौ.छायाताई चाफळे,मातृशक्ती संयोजिका विमान नगर प्रखंड श्री.अनिकेत चव्हाण, विश्रांतवाडी प्रखंड बजरंग दल सहसंयोजक, विशाल शर्मा येरवडा जिल्हा प्रखंड बजरंग दल सयोजक श्री.संजय हिवाळे विश्रांतवाडी धर्मप्रसार प्रमुख, महेश चोपडे व इतर कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

आपले

जिल्हाध्यक्ष – श्री मुकेश जी गोयल

जिल्हा मंत्री – श्री हनुमंत जी खांदवे

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**






# विहिंप तर्फे आषाढी वारीमध्ये मोफत आरोग्य सेवा

विश्व हिंदू परिषदेतर्फे दरवर्षी आषाढी वारीमध्ये मोफत आरोग्य सेवा पुरवली जाते. पाच रुग्णवाहिका आणि पंधरा ते वीस डॉक्टर, नर्सेस आणि अनेक प्रशिक्षित कार्यकर्ते या उपक्रमामध्ये पूर्ण वेळ सहभागी असतात. तसेच वारी मार्गावर अनेक ठिकाणी विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते ही वारी 'स्वच्छ आणि पर्यावरणपूरक' व्हावी यासाठी आपले योगदान देत असतात.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये संत निवृत्तीनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी मार्गांवर मोफत आरोग्य सेवा गेली ३९ वर्षे दिली जात आहे.

यंदा आरोग्य सेवा उपक्रमाचे चाळीसावे वर्ष आहे. पुण्याहून निघणाऱ्या रुग्णवाहिकांचे उद्घाटन दिनांक १० जुलै रोजी मा. आमदार श्री हेमंत रासने आणि इस्कॉन संस्थेचे उपाध्यक्ष श्री श्वेतदीपदास यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री श्वेतदीपदास म्हणाले वारकरी संप्रदाय, इस्कॉन संस्था, विश्व हिंदू परिषद हे आपण सगळे बांधवच आहोत. विश्व हिंदू परिषदेच्या दुसऱ्याच वर्षी इस्कॉन ची स्थापना झाली, आणि दोन्ही संस्था आज विश्वभर हिंदू धर्माचे संवर्धन करत आहेत. पंढरपूर मध्ये पंढरीनाथ आहे तोच पुरी मध्ये जगन्नाथ, अयोध्येमध्ये मध्ये रघुनाथ, अशा अनेक रूपांमध्ये भारतभर पूजला जातो. यापुढे हिंदू धर्मीयांचे संघटन आणि सामर्थ्य वाढणे आवश्यक आहे.

आमदार हेमंत रासने यांनी याप्रसंगी बोलताना विनाशकारी प्रवृत्तींपासून जगाला आध्यात्मिक शक्तीच वाचवू शकेल, आणि वारी हे त्या शक्तीचेच प्रतीक आहेअसे विचार मांडले.

जोपर्यंत पालखी सोहळा हा अखंडपणे चालू राहणार आहे, विश्व हिंदू परिषद वारकऱ्यांना विविध सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहणार आहे अशी खात्री त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा सहप्रमुख डॉक्टर शर्वरीताई येरगट्टीकर यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यातील सेवेचे महत्त्व समजावून सांगितले. सेवा मार्ग प्रमुख श्री. पुजारी आणि श्री. वाघ, तसेच आरोग्य सेवेसाठी वारीबरोबर पूर्णवेळ उपस्थित राहणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री मा. किशोरजी चव्हाण यांनी गेले ३९ वर्षे अव्याहतपणे चालू असलेल्या या आरोग्य सेवा उपक्रमाची माहिती थोडक्यात माहिती सांगितली.विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांतच्यावतीने आषाढी वारीच्या मार्गांवर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवा पुरवली जाते. ही सेवा

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

अखंड व अविरत सुरू आहे.वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य विश्व हिंदू परिषदेला लाभले आहे.

मुंबई क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख माननीय श्री संजय मुरदाळे यांनी आरोग्य सेवा उपक्रम कसा सुरू झाला आणि वाढत गेला यावर प्रकाश टाकला. गेली दोन वर्षे आरोग्य सेवेबरोबरच अनेक वारकऱ्यांना रेनकोट आणि छत्रीचे वाटप केले जाते. यावर्षी वीणेकऱ्यांना खास मोठ्या आकाराची छत्री दिली आहे हे मुरगाळे सरांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे पूर्व विभाग मंत्री श्री संतोषजी अनगोळकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी १००० वारकऱ्यांना रेनकोट वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्षा सौ लीना भावे,बजरंग दल प्रांत संयोजक श्री नितीन महाजन , धर्मयात्रा विभागाचे प्रमुख कुंदन तोडकर, धर्मप्रसार विभागाचे प्रांत सहप्रमुख श्री धनंजय गायकवाड, प्रचार प्रसार विभागाचे प्रमुख श्री संजय गोडबोले, समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी ,दुर्गा वाहिनी प्रांत सहसंयोजिका सौ आरती ताई भारती ,विभाग मंत्री केतन घोडके, प्रांत सेवा टोळीचे सदस्य श्री नाना क्षीरसागर, विभाग सहमंत्री श्री विजय कांबळे, दुर्गा वाहिनी विभाग संयोजिका कार्तिकीताई परदेशी इत्यादी उपस्थित होते.

कसबा जिल्हा बजरंग दलाने आज दिवसभर वारकऱ्यांची चरण सेवा सुद्धा केली.

कार्यक्रमासाठी पूर्वतयारी आणि नियोजन यासाठी भाग मंत्री श्री शैलेंद्र जाधव ,विक्रम घुंगुरवाले,गोपाल शिंदे यांच्यासह मातृशक्ती, दुर्गा वाहिनी आणि बजरंग दलाच्या अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

# वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा





**संत निवृत्तीनाथांच्या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर वारी मार्गावर विश्व हिंदू परिषदेची आरोग्य सेवा**

नगर – संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे थोरले बंधू आणि सद्‌ गुरू संत निवृत्तीनाथांच्या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना विश्व हिंदू परिषदेने त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर वारी मार्गावर सालाबादप्रमाणे आरोग्य सेवा याही वर्षी पुरवली आहे.

नगर शहरातील मार्केट यार्ड मध्ये निवृत्तीनाथांच्या पालखी सोहळ्याचे आगमन झाले. प्रती वर्षीप्रमाणे स्वतंत्र मंडप उभारून गरजेप्रमाणे अत्यावश्यक औषधी देण्याची खास व्यवस्था मार्केट यार्ड मध्ये करण्यात आली होती. प्रभू श्रीरामांच्या आणि भारत मातेच्या प्रतिमांचे पूजन करून आरोग्य सेवेचा शुभारंभ करताना आरोग्य पथकातील सर्वांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री सुनीलराव खिस्ती बोलताना म्हणाले, विहिंप गेल्या ३९ वर्षांपासून संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्‌ गुरू संत तुकाराम महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यासोबत आरोग्य सेवा करत आहे. यावर्षी विहिंप पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा विभागातर्फे वीणेकरींना छत्रीची भेट दिली जात आहे, असे सांगितले.

कार्यक्रमास विहिंपचे जिल्हा मंत्री अनिल जोशी, सहमंत्री शरदराव नगरकर आणि राजेंद्र चुंबळकर, जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख मिलिंद चवंडके, जिल्हा मंदिर अर्चक पुरोहित संपर्क प्रमुख राजेंद्र स्वामी, धर्म प्रसार जिल्हा सहप्रमुख अनिल देवराव, बजरंग दल जिल्हा संयोजक सोमनाथ चितळकर, जिल्हा दुर्गावाहिनी संयोजिका जयश्रीताई पोटे, मातृभक्तीच्या सौ.हेमलता कांबळे, सौ.मंगल गौरीधर हे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. आ.संग्रामभैय्या जगताप यांनी भेट देऊन विहिंपच्या आरोग्य सेवेचे कौतुक केले.

निवृत्तीनाथांचा संजीवन समाधी सोहळा तिथीप्रमाणे नगर शहरात साजरा केला जातो. त्यामुळे विसावलेल्या, थकलेल्या वारकरी बंधू–भगिनींच्या पायांना मालिश करून देणे आवश्यक असते. हे लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषदेने तरूण तज्ज्ञ डॉक्टर्सच्या

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

टीमकडून तीळाचे तेल लावून वारकऱ्यांना मालिश करून देण्याची विशेष काळजी घेतली. वारी मार्गावर महाप्रसादाची रेलचेल असते. औषधं तर भरपूर मिळतात. मात्र चालून थकलेल्या पायांना मालिश करणे आवश्यक असते. आपण सर्वांनी गरज पाहून सेवा उपलब्ध करून दिली, अशा प्रतिक्रिया ज्येष्ठ वारकऱ्यांमधून दिवसभर उमटत राहिल्या.

आषाढी वारी प्रमुख श्री.शिवाजी बोरुडे, श्री.अरविंद ब्राह्मणकर श्री.अशोक राजगुरू, श्री.नामदेवराव फिरके, श्री.मनोहर रहाणे, श्री.उत्तम वायचळ, श्री.शिर्के. श्री.रामभाऊ तळेकर, सौ.आशाताई कुमावत, सौ गंगाताई कोतवाल हे निवृत्तीनाथांच्या पालखी सोहळ्यासोबत पूर्णवेळ राहून आरोग्य सेवा देत आहेत.

नगर शहरात डॉ. मनोहर देशपांडे यांच्यासह डॉ.ऋतुजा नवले, डॉ.सानिका निकम, डॉ.शुभांगी नखाते, डॉ.पोर्णिमा भोंडवे, डॉ.दुर्गा सोनटक्के, डॉ.सायली जगताप, डॉ.हर्षदा कांबळे, डॉ.वैष्णवी शिंदे, डॉ.निखिल अनभुले, डॉ.आयुश आघाव हे आदित्य आयुर्वेद महाविद्यालय बीड, किसान ज्ञानोदय गुडेज मंडळ शिरपूर धुळे आणि काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी कॉलेज नगर या विद्यालयाचे विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने विश्व हिंदू परिषदेच्या आरोग्य सेवेत सहभागी झाले होते.

# कुटुंबव्यवस्था, स्वामी लक्ष्मणानंद सरस्वती हत्याकांड आयोगाच्या अहवालावर विश्व हिंदू परिषदेचा प्रस्ताव; संत रविदासजींची ६५०वी जयंती व श्रद्धेय अशोक सिंघलजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष योजना

नवी दिल्ली, २० जुलै २०२६ विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीची दोन दिवसीय बैठक दिनांक १९ व २० जुलै २०२६ रोजी छतरपूर, नवी दिल्ली येथील तेरापंथ भवन येथे संपन्न झाली. या बैठकीत देशभरातील केंद्रीय पदाधिकारी व प्रबंध समितीच्या सदस्यांनी सहभाग घेतला. समकालीन राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर सविस्तर विचारविनिमय केल्यानंतर खालील महत्त्वाचे प्रस्ताव पारित करण्यात आले.

१. कुटुंबव्यवस्था मजबूत करण्याबाबतचा प्रस्ताव :

बैठकीत भारतीय समाजाची मूलभूत शक्ती असलेल्या कुटुंबव्यवस्थेचे संरक्षण व सुदृढीकरण करण्यावर भर देण्यात आला. प्रस्तावात म्हटले आहे की, भारतीय कुटुंबव्यवस्थेने शतकानुशतके समाजाला संस्कारित, संघटित व आत्मीय ठेवण्याचे कार्य केले आहे. सध्याच्या काळातील आव्हानांवर समाज व शासन या दोन्ही स्तरांवर गंभीरपणे उपाययोजना करणे आवश्यक आहे. काही न्यायालयीन निर्णयांमुळे पारंपरिक सुदृढ कुटुंबव्यवस्थेला धक्का पोहोचला आहे. विवाहबाह्य संबंधांना मान्यता, लिव्ह–इन रिलेशनशिपला वैधानिक मान्यता, समलैंगिकतेला मान्यता इत्यादी विषयांवर व्यापक चर्चा घडवून आणून, कुटुंबव्यवस्थेची हानी रोखण्यासाठी कायदे करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली. परिषदेने कुटुंब प्रबोधन तसेच कौटुंबिक मूल्यांच्या संरक्षणासाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.

२. स्वामी लक्ष्मणानंद सरस्वतीजींच्या हत्येच्या चौकशी आयोगाच्या अहवालाबाबत चिंता :पूज्य स्वामी लक्ष्मणानंद सरस्वतीजींची कंधमाल (ओडिशा) येथे झालेल्या निर्घृण हत्येच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाचा अहवाल गायब होणे आणि तो सार्वजनिक न करण्यात येणे, याबाबत बैठकीत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

केंद्रीय प्रबंध समितीने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी सी.बी.आय.मार्फत करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयातील सत्य जनतेसमोर आणणे हे न्याय व जनविश्वासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याचे परिषदेने म्हटले आहे. ओडिशामध्ये मतांतरावर पूर्णपणे प्रतिबंध घालण्याचे आवाहन करण्यात आले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

३. संत रविदासजींच्या ६५०व्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष वक्तव्य : संत शिरोमणी गुरु रविदासजींच्या ६५०व्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष वक्तव्य पारित करण्यात आले. परिषदेने म्हटले आहे की, संत रविदासजींनी दिलेला सामाजिक समरसता, समानता, आध्यात्मिक चेतना व मानवी प्रतिष्ठेचा संदेश आजही संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे.

संत रविदासजींचे संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी देशभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प परिषदेने केला आहे.

४. श्रद्धेय अशोक सिंघलजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष योजना : दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीराम जन्मभूमी आंदोलनाचे प्रणेते श्रद्धेय अशोक सिंघलजींची जयंती आहे. बैठकीत निर्णय घेण्यात आला की, संपूर्ण वर्षभर हिंदू समाजासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात येईल. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात विश्व हिंदू परिषद संघटनात्मक विस्तारावर विशेष लक्ष केंद्रित करेल.

अशोक सिंघलजींनी राम मंदिर आंदोलनाला मजबूत नेतृत्व दिले. हिंदू जागरण अभियान राबविले आणि सामाजिक समरसतेला प्रोत्साहन दिले. गोआधारित शेतीच्या माध्यमातून गोसंरक्षण व गोसंवर्धनाचे कार्य अधिक व्यापक करण्यात येईल. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनर्स्थापनेचे केंद्र म्हणून वेद विद्यालये विकसित करण्यात येतील.

अशोक सिंघलजींनी विश्व हिंदू परिषदेला एक शक्तिशाली संघटना म्हणून स्थापित केले. त्यांच्या दूरदर्शी विचारांनी व अथक प्रयत्नांनी हिंदू समाजामध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त १ कोटी हितचिंतक बनविण्याचा संकल्प करण्यात आला.

बैठकीचा समारोप हिंदू समाजाला संघटित करण्याचा, सनातन मूल्यांचे संरक्षण करण्याचा तसेच राष्ट्रहिताच्या कार्यात सक्रिय भूमिका निभावण्याचा दृढ संकल्प करून करण्यात आला.

**जारीकर्ता : विजय शंकर तिवारी**

**अखिल भारतीय प्रचार-प्रसार विभाग**

**विश्व हिंदू परिषद**

---



## मातृशक्ती : आरोग्य शिबिर

सोमवार, २०/०७/२०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीमध्ये मातृशक्ती द्वारा कसबा भाग मधील रविवार पेठ जैन मंदिरामध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रांत मंत्री माननीय किशोरजी चव्हाण, डॉ. प्रतिभाताई बोथरे, आणि डॉ. फाल्गुनी जपे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन समयी डॉ. कांचन खैराटकर, प्रांत मातृशक्ती संयोजिका प्रिया रसाळ, शारदा रिकामे, आशा टेकवडे, सुरेखा बल्लाळ, कांचन दोडे, सीमा मुखर्जी, कार्तिकी परदेशी, सुकन्या काची, दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे नेत्र तपासणी करणारे डॉक्टर, विजय कांबळे,रविवार पेठेतील ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत झाले.

शिबिर नियोजनाच्या व्यवस्थेमध्ये ऋषिकेश सपाटे, पार्थ चासकर,शैलेंद्र जाधव,विक्रम घुंगरूवाला, गोपाळ शिंदे , विजय थोरात, शंतनू ठाकूर याचे मोलाचे सहकार्य झाले. स्थानिक नागरिकांचे सुद्धा यात मोलाचे सहकार्य होते तसेच त्यांनी शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिरामध्ये एकूण १०१ जणांचे आरोग्य तपासणी करण्यात आली यात नेत्र तपासणी , ब्लड प्रेशर, नाडी परीक्षण तसेच बदलत्या ऋतूमुळे होणाऱ्या आजारांचे तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे गरजू गरीब असणाऱ्या महिला आणि पुरुषांना नेत्र तपासणी करून आरोग्य तपासणी करून त्यांना असणाऱ्या आजाराचे निदान करण्यात आले व त्यासाठी आवश्यक उपचारासाठी योग्य तज्ञांचे सल्ले देण्यात आले. चष्मा वाटप देखील करण्यात आले. शिबिरा दरम्यान रविवार पेठेतील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी या शिबिराला भेट दिली.

# विहिंप निमित्त विहिंपची पालखी मार्गांवर आरोग्य सेवा






५ रुग्णवाहिका, २०डॉक्टर, नर्सेस आणि अनेक प्रशिक्षित कार्यकर्ते यांचा सहभाग

पुणे : दरवर्षी आषाढी वारीत पालखी मार्गांवर सर्व ठिकाणी विश्व हिंदू परिषदेचे वतीने आरोग्य सेवा हा उपक्रम राबविला जातो. विहिंप कार्यकर्ते ही वारी 'स्वच्छ आणि पर्यावरणपूरक' व्हावी यासाठी योगदान देतात. संत निवृत्तीनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी मार्गांवर मोफत आरोग्य सेवा गेली ३९ वर्षे दिली जात आहे.

यंदा आरोग्य सेवा उपक्रमाचे चाळीसावे वर्ष असून पुण्याहून निघणार्या रुग्णवाहिकांचे उद्घाटन १० जुलै रोजी आ. हेमंत रासने आणि इस्कॉन संस्थेचे उपाध्यक्ष श्री श्वेतदीपदास यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री श्वेतदीपदास म्हणाले, वारकरी संप्रदाय, इस्कॉन व विहिंप आपण सगळे बांधवच आहोत. संपूर्ण विश्वभर हिंदू धर्माचे संवर्धन करीत आहेत. आ. हेमंत रासने यांनी, आपले विचार मांडताना, जोपर्यंत पालखी सोहळा अखंडपणे चालू राहणार आहे , विश्व हिंदू परिषद वारकऱ्यांना विविध सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहणार, अशी खात्री दिली. प्रारंभी पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा सहप्रमुख डॉ. शर्वरी येरगट्टीकर यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यातील सेवेचे महत्त्व सांगितले. सेवा मार्ग प्रमुख श्री. पुजारी आणि श्री. वाघ, तसेच आरोग्य सेवेसाठी वारीबरोबर पूर्णवेळ उपस्थित राहणार्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोरजी चव्हाण यांनी गेले ३९ वर्षे अव्याहतपणे चालू असलेल्या या आरोग्य सेवा उपक्रमाची माहिती दिली.मुंबई क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख श्री संजय मुरदाळे यांनी आरोग्य सेवा उपक्रम कसा सुरू झाला यावर प्रकाश टाकला. गेली दोन वर्षे आरोग्य सेवेबरोबरच अनेक वारकर्यांना रेनकोट आणि छत्रीचे वाटप केले जाते. यावर्षी विणेकर्यांना खास मोठ्या आकाराची छत्री दिली आहे हे मुरदाळे सरांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे पूर्व विभाग मंत्री श्री संतोष अनगोळकर यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्षा लीना भावे, बजरंग दल प्रांत संयोजक श्री नितीन महाजन, धर्मयात्रा विभाग प्रमुख कुंदन तोडकर, धर्मप्रसार प्रांत सहप्रमुख श्री धनंजय गायकवाड, प्रचार प्रमुख श्री संजय गोडबोले, समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी, दुर्गा वाहिनी प्रांत सहसंयोजिका सौ आरती भारती, विभाग मंत्री केतन घोडके, प्रांत सेवा टोळी सदस्य श्री नाना क्षीरसागर, विभाग सहमंत्री श्री विजय कांबळे, दुर्गा वाहिनी विभाग संयोजिका कार्तिकी परदेशी उपस्थित होते.

कसबा जिल्हा बजरंग दलाने आज वारकर्यांची चरण सेवा केली.कार्यक्र पूर्वतरीसाठी भाग मंत्री श्री शैलेंद्र जाधव, विक्रम घुंगुरवाले, गोपाल शिंदे यांच्यासह मातृशक्ती, दुर्गा वाहिनी आणि बजरंग दलाच्या अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**(वार्तांकन : विजयकुमार पिसे,विभाग मंत्री विहिंप)**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# चिंचवड ते पंढरपूर विहिंपची आषाढी आरोग्य वारी

## वैद्यकीय सेवाकार्याचा ह.भ.प. संतोष महाराज काळोखे देहूकरांच्या हस्ते शुभारंभ, संत साहित्यातून योग्य आहार विहारांचे मार्गदर्शन





पिंपरी चिंचवड : ज्ञानेश्वर माउली, जगद्गुरू तुकोबाराय आणि सर्व संतांनी आपल्या साहित्यातून वारीच्या काळात योग्य आहारविहार कसा असावा याचे मार्गदर्शन केले आहे, असे विचार महाराष्ट्र राज्य सकल संत विचार समितीचे अध्यक्ष ह. भ. प. संतोष महाराज काळोखे (देहूकर) यांनी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत आणि पिंपरी,चिंचवड जिल्हा आयोजित चिंचवड ते पंढरपूर आषाढी आरोग्य वारी वैद्यकीय सेवाकार्याचा शुभारंभ काळोखे महाराज यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी ते बोलत होते.

निगडी प्राधिकरण येथे सावरकर मंडळ सभागृहात आयोजित विहिंपच्या आषाढी आरोग्य वारी वैद्यकीय सेवाकार्याच्या शुभारंभप्रसंगी विहिंप पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, प्रांत उपाध्यक्षा माधवी सौंशी, उद्योजक सुरेश पटेल, जिल्हा अध्यक्ष ॲड. ललित झुनझुनवाला, जिल्हा मंत्री संभाजी बालघरे आदी मान्यवर उपस्थित होते. ह. भ. प. काळोखे देहूकर महाराज पुढे म्हणाले की, हरिभक्तांना वारीत चालण्याची ताकद अन् सतत नामस्मरणाचे बळ लाभावे यासाठी संतसाहित्यातून मार्गदर्शन करण्यात आले आहे. गेल्या ३९ वर्षांपासून विश्व हिंदू परिषद तोच विचार आषाढी आरोग्य वारी वैद्यकीय सेवाकार्याच्या माध्यमातून समर्थपणे पुढे नेत आहे. याप्रसंगी ॲड. सतीश गोरडे म्हणाले, प्लॅस्टिकमुक्त आणि पर्यावरणपूरक वारीसाठी विश्व हिंदू परिषद सुमारे ३९ वर्षांपासून आरोग्य सेवाकार्याचे आयोजन करीत असते. पिंपरी, चिंचवड येथील माउली आणि तुकोबाराय यांची वारी तसेच नाशिक येथून येणारी संत निवृत्तीनाथ यांची वारी पूर्णत: पर्यावरणपूरक असावी ही काळजी घेण्यात येते. यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि औद्योगिक आस्थापनांना केलेल्या आवाहनाला उदंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे प्रत्येक वारीत सहा सुसज्ज रुग्णवाहिका, वैद्यकीय तज्ज्ञ आणि प्रशिक्षित परिचारिका यांचे पथक, अत्यावश्यक औषधांचा साठा अशा उपलब्ध होतो. यंदा आरोग्य सेवेचे चाळीसावे वर्ष असल्याचेही ॲड.गोरडे म्हणाले.

विश्व हिंदू परिषद प्रांत सेवा सहप्रमुख डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी प्रास्ताविक केले. संभाजी बालघरे यांनी मनोगत व्यक्त केले. यशवंत देशपांडे, पी.एस. पुजारी व बाळासाहेब वाघ, ॲड. मनिषा नंदी यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन किरण शिंदे, आभार ॲड ललित झुनझुनवाला यांनी केले. संयोजन परेश पटेल, विजय देशपांडे, प्रशांत कुलकर्णी, सौ तेजस्विनीताई ढोमसे, नवनाथ साकोरे, अरविंद लंघे, पन्नालाल जाधव, कौशल रावल यांनी केले.

**(वार्तांकन : विजयकुमार पिसे,विभाग मंत्री विहिंप)**

# सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर शेगावीच्या राणावर मेघवृष्टी
# संत गजानन महाराज पालखीचे सरहद्दीवर विहिंपतर्फे स्वागत



सोलापूर : शेगावीचा राणा संत श्री गजानन महाराज पालखी सोहळा सोलापूर जिह्याच्या सीमेवर दाखल होताच मेघवृष्टीने समस्त भाविक पायी वारकर्यांना चिंब भिजवून स्वागत केले. शुक्रवारी सायंकाळी पावणेसहा वाजता तामलवाडीमार्गे पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. दुपारपासूनच उळे, कासेगाव, गंगेवाडी पंचक्रोशीतील ग्रामस्थ कासेगाव पाटी येथे पालखी सोहळ्याच्या प्रतीक्षेत होते. शेगावीचा राणावर एकीकडे पुष्पवृष्टी सुरू असतानाच आकाशातून मेघ देखील बरसले. हा अपूर्व सोहळा याची देही याची डोळा समस्त भाविकांना तृप्त करून गेला. यानिमित्ताने या भागात पहिल्यांदाचा पावसाने हजेरी लावली. त्यामुळे संत गजानन महाराजांसोबत वरुणराजाचे आगमन झाल्यामुळे बळीराजाही सुखावला. आता पेरण्यांची लगबग सुरू होईल, याचा आनंद समस्त शेतकर्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहात होता. यंदाच्या वर्षी प्रथमच विश्व हिंदू परिषदेच्या वतीने पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर स्वागत करण्यात आले.

तामलवाडीहून पालखी सोहळा सरहद्द सीमेवर प्रवेश करते, यावेळी प्रशासनाकडून गजानन महाराज पालखीचे औपचारिक स्वागत होते. आणि कासेगाव पाटी येथे सर्वप्रथम जिल्ह्याच्या वतीने पंचक्रोशीतून गावकरी ग्रामस्थ आणि भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेच्यावतीने पालखी सोहळा स्वागताचे आयोजन या ठिकाणी केले होते. जिल्हा अध्यक्ष विष्णू मोंढे पाटील, उपाध्यक्ष ॲड.केदार पाटील शेळगीकर, विभाग मंत्री विजयकुमार पिसे, जिल्हामंत्री जयदेव सुरवसे, सहमंत्री विष्णू जगताप, धर्माचार्य संपर्क विभागाचे प्रांत सदस्य ह.भ.प.अभिमन्यू महाराज डोंगरे, जिल्हा सहप्रमुख अविनाश माने, बजरंग दल संयोजक अभय कुलथे, सेवाकार्य विभागाचे प्रमुख राजेश यनगंटी, सहप्रमुख अरुण नंदाल, विनोद गौडा, लक्ष्मण चन्ना, सामाजिक समरसता विभाग प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी कासेगावकर, दुर्गावाहिनी संयोजिका ऐश्वर्या सारोळकर, आनंद बुर्हांडे, जोतिबा गुंड, विभुते, प्रखंड मंत्री सूरज मोरे, संदीप क्षीरसागर उपस्थित होते.



कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी सोहळ्याच्या मार्गावर फुलांचा सडा घातला होता. तसेच स्वागताची जय्यत तयारी केली होती. याठिकाणी पालखीचे आगमन होताच विहिंप जिल्हा अध्यक्ष विष्णू मोंढे, सरपंच यशपाल वाडकर यांच्याहस्ते पालखीस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विहिंप कार्यकर्ते विठुनामाचा गजर करीत होते, तर आकाशातून मेघवृष्टीदेखील सुरू होती.

**वार्तांकन : विजयकुमार पिसे, विभाग मंत्री विहिंप**

# संत रविदासजींची ६५०वी जन्मशताब्दी आणि अशोक जी सिंघल जन्मशताब्दी वर्षानिमित्त विहिंप १ कोटी हितचिंतक बनविणार

नवी दिल्लीत विहिंप केंद्रीय प्रबंध समिती बैठकीत राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर प्रस्ताव. काही न्यायालयीन निर्णयांमुळे पारंपरिक सुदृढ कुटुंब व्यवस्थेला धक्का, स्वामी लक्ष्मणानंद सरस्वती हत्याकांड आयोगाच्या अहवालावर चिंता...संत रविदासजींचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी देशभर विविध कार्यक्रम

नवी दिल्ली, : विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रबंध समितीची दोन दिवसीय बैठक १९ व २० जुलै रोजी छतरपूर, नवी दिल्ली येथे पार पडली. या बैठकीत संत रविदासजींची ६५०वी जन्मशताब्दी आणि श्रद्धेय अशोक जी सिंघल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुढील वर्षभरात देशभर विविध कार्यक्रम तसेच संघटनात्मक विस्तारावर विशेष भर देण्याचा निर्णय झाला. विशेषत: जन्मशताब्दी वर्षानिमित्त विहिंप १ कोटी हितचिंतक बनविणार आहे. तसेच समकालीन राष्ट्रीय व सामाजिक विषयांवर महत्वाचे प्रस्तावही यावेळी पारित करण्यात आले.

देशभरातील केंद्रीय पदाधिकारी व प्रबंध समितीच्या सदस्यांची प्रमुख उपस्थिती या बैठक़ीस होती. यावेळी खालील प्रस्ताव पारित झाले.

**१) कुटुंबव्यवस्था मजबूत करण्याबाबतचा प्रस्ताव :**

केंद्रीय बैठकीमध्ये भारतीय समाजाची मूलभूत शक्ती असलेल्या कुटुंबव्यवस्थेचे संरक्षण व सुदृढीकरण करण्यावर भर देण्यात आला. प्रस्तावात म्हटले आहे की, भारतीय कुटुंबव्यवस्थेने शतकानुशतके समाजाला संस्कारित, संघटित व आत्मीय ठेवण्याचे कार्य केले आहे. सध्याच्या काळातील आव्हानांवर समाज व शासन या दोन्ही स्तरांवर गंभीरपणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.काही न्यायालयीन निर्णयांमुळे पारंपरिक सुदृढ कुटुंबव्यवस्थेला धक्का पोहोचला आहे.

विवाहबाह्य संबंधांना मान्यता, लिव्ह–इन रिलेशनशिपला वैधानिक मान्यता, समलैंगिकतेला मान्यता इत्यादी विषयांवर




व्यापक चर्चा घडवून आणून, कुटुंबव्यवस्थेची हानी रोखण्यासाठी कायदे करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली.०० त्या पार्श्वभूमीवर विश्व हिंदू परिषदेने कुटुंब प्रबोधन तसेच कौटुंबिक मूल्यांच्या संरक्षणासाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय यावेळी घेतला.

**२) स्वामी लक्ष्मणानंद सरस्वतीजींच्या हत्येच्या चौकशी आयोगाच्या अहवालाबाबत चिंता करण्यात आली.**

पूज्य स्वामी लक्ष्मणानंद सरस्वतीजींची कंधमाल (ओडिशा) येथे झालेल्या निर्घृण हत्येच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या आयोगाचा अहवाल गायब होणे आणि तो सार्वजनिक न करण्यात येणे, याबाबत विहिंपच्या बैठकीत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली.

केंद्रीय प्रबंध समितीने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी सी.बी.आय.मार्फत करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयातील सत्य जनतेसमोर आणणे हे न्याय व जनविश्वासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याचे परिषदेने म्हटले आहे. ओडिशामध्ये मतांतरावर पूर्णपणे प्रतिबंध घालण्याचे आवाहन करण्यात आले.

**३) संत रविदासजींच्या ६५०व्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष वक्तव्य :**

संत शिरोमणी गुरु रविदासजींच्या ६५०व्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष प्रस्ताव पारित करण्यात आला. विश्व हिंदू परिषदेने म्हटले आहे की, संत रविदासजींनी दिलेला सामाजिक समरसता, समानता, आध्यात्मिक चेतना व मानवी

प्रतिष्ठेचा संदेश आजही संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे. संत रविदासजींचे संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी देशभर विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प परिषदेने केला आहे.

**४) श्रद्धेय अशोक सिंघलजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष योजना यावेळी आखण्यात आली.**

दिनांक २७ सप्टेंबर२०२६ रोजी श्रीराम जन्मभूमी आंदोलनाचे प्रणेते श्रद्धेय अशोक जी सिंघल यांची जयंती आहे. यानिमित्त संपूर्ण वर्षभर हिंदू समाजासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचविण्यात येईल. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात विश्व हिंदू परिषद संघटनात्मक विस्तारावर विशेष लक्ष केंद्रित करेल. अशोक सिंघलजींनी राम मंदिर आंदोलनाला मजबूत नेतृत्व दिले. हिंदू जागरण अभियान राबविले आणि सामाजिक समरसतेला प्रोत्साहन दिले. गोआधारित शेतीच्या माध्यमातून गोसंरक्षण व गोसंवर्धनाचे कार्य अधिक व्यापक करण्यात येईल. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनर्स्थापनेचे केंद्र म्हणून वेद विद्यालये विकसित करण्यात येतील. अशोक सिंघलजींनी विश्व हिंदू परिषदेला एक शक्तिशाली संघटना म्हणून स्थापित केले. त्यांच्या दूरदर्शी विचारांनी व अथक प्रयत्नांनी हिंदू समाजामध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त १ कोटी हितचिंतक बनविण्याचा संकल्प करण्यात आला. बैठकीचा समारोप हिंदू समाजाला संघटित करण्याचा, सनातन मूल्यांचे संरक्षण करण्याचा तसेच राष्ट्रहिताच्या कार्यात सक्रिय भूमिका निभावण्याचा दृढ संकल्प करून करण्यात आला.जय श्रीराम!

**(वार्तांकन : विजयकुमार पिसे,विभाग मंत्री विहिंप)**




## दुर्गा वाहिनीकडून माउली पालखीची सेवा आणि स्वागत

### विहिंपची आरोग्य वारी नातेपुतेत दाखल, मुक्कामाच्या ठिकाणी पावसाची जोरदार हजेरी

माळशिरस : आषाढी वारीनिमित्त आळंदीहून पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा नातेपुते येथे मुक्कामाच्या ठिकाणी तळ ठोकला तेव्हा वरुण राजाने वारकर्यांना चिंब भिजवलं. तरीही वारकर्यांचा टाळ मृदंगाचा गजर सुरू होता. यावेळी विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनीच्यावतीने संतश्रेष्ठ ज्ञानोबा पालखीचे स्वागत करण्यात आले. तसेच पुण्याहून निघालेल्या आरोग्य वारीच्या माध्यमातून वारकऱ्यांची सेवा दुर्गा वाहिनी आणि विहिंप कार्यकर्त्यांनी केली.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

सोलापूर जिल्ह्यात धर्मपुरी येथे ज्ञानराजांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत झाल्यानंतर मोरोची येथे दुपारचा विसावा पार पडला. विहिंपची आरोग्यवारी मोरोची येथून नातेपुते येथे दाखल झाली. या निमित्ताने नातेपुते येथे दुर्गावाहिनीच्या वतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. दुर्गा वाहिनी विभाग प्रमुख सौ. प्रगती सतीश नाकुरे यांच्यासह दुर्गा कु.उन्नती युवराज माने देशमुख (पंढरपूर जिल्हा संयोजिका), दुर्गा कु.युविका कदम (अकलूज प्रखंड संयोजिका) तसेच दुर्गा कु.सानिका देवल (नातेपुते खंड संयोजिका) उपस्थित होत्या. तसेच डॉ. शर्वरी यरगट्टीकर (पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा विभाग सहप्रमुख) मातृशक्ती सौ. अनिताताई पडवळ (पिंपरी जिल्हा) यांनीही स्वागत कार्यक्रमात सहभाग घेतला. याप्रसंगी विहिंपचे विभाग मंत्री श्री. विजयकुमार पिसे, अकलूजचे श्री. शिवाजीराव घोडके (पंढरपूर जिल्हा सहमंत्री) यांनी उपस्थित राहून दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्यांना सेवा, संघटन व कार्यविस्तार याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पालखी सेवा कार्यात त्यांनी सहभाग घेतला. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील आरोग्यवारीचे पथक प्रमुख श्री. पुजारी काका यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर, नर्सेस, ॲम्बुलन्स चालक तसेच विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते असे १३ जणांचे पथक या सेवाकार्यात सक्रिय आहेत. नातेपुतेचा मुक्काम संपवून माउलींचा पालखी सोहळा माळशिरसमध्ये दाखल झाला. आता वारकर्यांना पंढरीची ओढ लागली असून प्रवाही वारकरी माळशिरस, अकलूज,श्रीपूर,वेळापूर, तोंडले बोंडल्याकडे मार्गस्थ होत आहेत. काल पालखी मार्गावर पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे वारी मार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी व वाहतूक कोंडी झाली होती. पावसाच्या सरींनी वारीचा मार्ग भिजविला, पण वारकर्यांची भक्ती आणि सेवेचा संकल्प अधिकच दृढ झाला. आरोग्यवारीच्या पथकाने उत्कृष्ट समन्वय राखत नातेपुते येथे आपली सेवा रुजू केली. नातेपुते येथे प्रथमच दुर्गा वाहिनीच्या माध्यमातून सेवा, सुरक्षा आणि संस्काराचे कार्य प्रभावीपणे सुरू झाले आहे. पालखी सोहळ्यात वारकरी सेवा केल्याचे समाधान दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्यांना लाभले.

**वार्तांकन : विजयकुमार पिसे,विभाग मंत्री विहिंप**


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

## प्लॅस्टिकचा कचरा व प्लास्टिक बॉटल्स एकत्र संकलन

जय श्रीराम विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत यांच्या वतीने दिनांक ११.०७. २०२६. रोजी प्लॅस्टिक मुक्त व पर्यावरण स्नेही सेवा कार्याच्या निमित्ताने पहाटे संत श्रेष्ठ तुकाराम महाराज. संत श्रेष्ठ ज्ञानोबा महाराज व इतर पालखी व वारकरी पुढे गेल्यानंतर स्वतः वारीसोबत व दर्शनास न जाता रस्त्यावर राहिलेला प्लॅस्टिकचा कचरा व प्लास्टिक बॉटल्स एकत्र संकुलन करून त्याचे व्यवस्थितपणे विल्हेवाट करण्याचे काम विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकर्त्यांनी पूर्ण करण्यात आले. याच उपक्रमास त्यांनी देवाचे दर्शन असे संबोधले. या उपक्रमास महाराष्ट्र प्रांत मंत्री श्री किशोर जी चव्हाण. दुर्गा वाहिनी प्रांत सहसंयोजिका आरती भारती ताई पुणे पश्चिम महाराष्ट्र मंत्री श्री केतन जी घोडके. पुणे पूर्व विभाग सहमंत्री श्री विजय जी कांबळे दुर्गा वाहिनी पुणे पूर्व संयोजिका कार्तिकीताई परदेशी व इतर जिल्ह्यांचे मंत्री सहमंत्री कार्यकारणी सदस्य मातृशक्ती दुर्गा वाहिनी उपस्थित होते.

**शैलेंद्र जी जाधव, कसबा जिल्हा मंत्री.**

—

# प्लास्टिक मुक्त व पर्यावरण पूरक वारी उपक्रम

## विश्व हिंदू परिषद - हडपसर जिल्हा

शनिवार, दिनांक ११ जुलै २०२६ रोजी विश्व हिंदू परिषद, हडपसर जिल्हा यांच्या वतीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी मार्गांवर प्लास्टिक मुक्त व पर्यावरण पूरक वारी या उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला. या कार्यक्रमास माननीय श्री. पांडुरंगजी (अण्णा) राऊत (पश्चिम महाराष्ट्र प्रांत पालक व कार्यकारिणी सदस्य), श्री. संजयजी मुद्राळे (महाराष्ट्र व गोवा धार्मिक पुंज प्रमुख), सौ. आशाताई टेकवडे (मातृशक्ती प्रांत सहसंयोजिका), सौ. सुरेखाताई कवडे (दुर्गावाहिनी प्रांत बालसंस्कार प्रमुख),

श्री. पांडुरंग रोडे, विभाग सहमंत्री. श्री. नंदकिशोर काळभोर (अध्यक्ष, हडपसर जिल्हा), ॲड. श्री. मनोज काळे (उपाध्यक्ष, हडपसर जिल्हा), श्री. राजेंद्र शेवाळे (मंत्री, हडपसर जिल्हा) तसेच श्री. शशिकांत घाटे (जिल्हा सहमंत्री) यांची विशेष उपस्थिती लाभली.

उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी माननीय श्री. पांडुरंगजी (अण्णा) राऊत यांनी सांगितले की, विश्व हिंदू परिषद राबवत असलेला प्लास्टिक मुक्तीचा उपक्रम पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचा असून अशा प्रकारचे उपक्रम सर्वत्र राबविण्याची गरज आहे. त्यांनी प्रत्येक गाव आणि वस्ती प्लास्टिकमुक्त झाली पाहिजे. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये असे उपक्रम राबवायला हवेत. असे मत व्यक्त केले.

श्री. संजयजी मुद्राळे म्हणाले, वारी ही केवळ आध्यात्मिक यात्रा नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. प्लास्टिकचा वापर टाळून आपण पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. युवकांनी पुढे येऊन सजग आणि जबाबदार समाज घडवावा.

या उपक्रमात धर्मयात्रा विभागाचे १०० हून अधिक कार्यकर्ते सहभागी झाले. विशेष टी–शर्ट व आषाढी वारी प्रतिनिधी ओळखपत्र परिधान करून युवक–युवतींनी जनजागृती फलक, प्लास्टिक संकलन केंद्रे तसेच प्लास्टिकमुक्तीची व्यापक जनजागृती मोहीम राबवली.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी मार्गावर विश्व हिंदू परिषदेतर्फे वारकरी बांधवांना विशेष छत्र्यांचे तसेच रेनकोटचे वाटप करण्यात आले.

यंदा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या हडपसर ते सासवड तसेच जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या हडपसर ते लोणी काळभोर या पालखी मार्गांवर हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला.

या उपक्रमाचे समाजातील सर्व स्तरांतून मोठ्या प्रमाणावर कौतुक करण्यात आले. आदर पुनावाला क्लीन सिटी यांचे या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सामाजिक समरसता प्रमुख श्री. अक्षय आबनावे यांनी केले, तर जिल्हा कोषाध्यक्ष श्री. राहुल मोडक यांनी सर्व मान्यवर, कार्यकर्ते व स्वयंसेवकांचे आभार मानले.

– श्री. राजेंद्र शेवाळे

मंत्री, हडपसर जिल्हा

# ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
# श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

| मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत | मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर |
|---|---|
| अध्यक्ष व कार्यकारी संचालक | कार्याध्यक्ष |

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्taराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता

आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# अमीर खान चे तिसरे लग्न

नुकतेच (सु)प्रसिद्ध कलाकार आमिर खान यांनी गाजावाजा करून तिसरे लग्न केले.

मीडिया नेही भरपूर प्रसिद्धी दिली. काही लोकांनी त्याबद्दल हलके विनोद केले. तर काही लोकांनी ट्रोल केले. लग्नाला पहिल्या दोन बायका, त्यांची मुले आली होती. त्यांचे (आनंदी) चेहरे दाखवले गेले. पण खरेच तसे होते का? हा प्रश्न मला भेडसावत होता. खूप रागही येत होता. आणि ११ जुलै च्या महाराष्ट्र टाइम्स मधील पुणे प्लस च्या ५ व्या पानावरील श्री श्रीपाद ब्रम्हे यांचा लेख वाचला व रागाचा स्फोट झाला.

लेखक म्हणतात आंतरधर्मीय लग्नापेक्षा दोन किंवा तीन लग्न करणाऱ्या नटाविषयी अधिक चर्चा होते. यात मध्यमवर्गीयांना वाटणाऱ्या सूक्ष्म असूयेचाही भाग आहेच. आपल्याला एकच लग्न करण्याची मुभा किंवा ते टिकवण्याची सक्ती आणि यांचं पहा दोन दोन, तीन तीन लग्नं करत आहेत, असा एक मत्सरयुक्त भाव त्यात असतो.

भारतातील सर्व मध्यमवर्ग जो हिंदू आहे, त्याबद्दल लेखक हे लिहीत आहेत. पुढे ते लिहितात. हल्ली घटस्फोट प्रमाण वाढले आहे. तसेच पुनर्विवाह ही वाढले आहेत. आणि हे सर्व हिंदू समाज म्हणूनच ते लिहित आहेत.

सर्वसामान्य मध्यमवर्गीय असा हिंदू समाज हा एक पत्नी असणाऱ्या श्री प्रभू श्रीरामाला मानतो. तसेच ज्याने कंसाच्या तुरुंगातील १६,००० स्त्रियांना, ज्यांना त्यावेळच्या रुढी प्रमाणे समाजात सामावून घेतले जात नव्हते, त्यांना मानाचे स्थान दिले, त्या भगवान श्रीकृष्णालाही मानतो. त्यामुळे तथाकथित हजारात एक असलेला पुरोगामी सोडून अन्य समाजाला आमिर खानने दोन-तीन लग्नं केली, याबद्दल असूया तर निश्चितच नाही.

हिंदू समाजातच काय तर एकंदरीतच (कोणत्याही धर्मातील) पुरुषाला आपल्या बायकोचे दुसऱ्या कोणावर तरी प्रेम आहे, ही कल्पनाच सहन होत नाही. तसेच स्त्रीला सुद्धा आपल्या नवऱ्याचे दुसऱ्या बाईवर प्रेम आहे किंवा दुसऱ्या बाईशी तो लग्न करणार आहे, ही कल्पनाही सहन होत नाही. तीच परिस्थिती मुलांची. त्यांनाही आपल्या आई-बाबांनी विभक्त होणे आणि दुसरे लग्न करणे, हे सहजासहजी मान्य होत नाही.

त्यामुळे अमीर खानच्या पहिल्या दोन बायका व त्यांच्या मुलांना हे तिसरे लग्न मनापासून मान्य असेल. ही शक्यता खरी वाटतच नाही. फक्त मुसलमानांत एकंदरीतच पुरुषांना असलेल्या मोकळ्या रानामुळे, व स्त्री ला स्थानच नसल्याने, त्यांच्या पहिल्या बायकांना व मुलांना हे तिसरे लग्न नाईलाजाने मान्य करावे लागत असेल.

सरफरोश, लगानया सिनेमानंतर, तसेच पाणी फाउंडेशन च्या कामामुळे मला अमीर खान आवडायला लागलेला होता. पण नंतरचे काही सिनेमे फक्त हिंदू धर्मियांच्या विरुद्ध होते, तेव्हापासून मनातून उतरायला लागला. आणि आता ६१ व्या वर्षी पुन्हा तिसरे लग्न केल्यामुळे त्याची चीड आली.

मुस्लिम धर्मीय असल्याचा गैरफायदा घेणे. हे अत्यंत चुकीचे आहे. घृणास्पद आहे. आणि विशेषतः सेलिब्रेटी असलेल्या, पाणी फाउंडेशन तर्फे सामाजिक काम करणाऱ्या आमिर खानने आपल्या पहिल्या बायका व मुलांचा विचारही न करता असा गैरफायदा घेणे, हे अजून जास्त चुकीचे आहे.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर समान नागरी कायदा अनिवार्य आहे, हे लक्षात येते. या कायद्यामुळे सर्वच समाजातील महिलांचा आणि मुलांचा मानसिक छळ होणार नाही.

त्यामुळे सर्वांनीच समान नागरी कायद्यासाठी आग्रह धरणे, आवश्यक आहे

**कुमार आठवले**

◈ ◈ ◈

# संस्कृत दिन - भाषा संस्कृतीच्या वारसाची!

आपला भारत देश हा जसा अनेक संस्कृती व परंपरा यांनी समृद्ध आहे, त्याचप्रमाणे तो अनेकविध भाषांनी विविध प्रांतांशी जोडला गेला आहे.

खरं तर भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसते; तर भाषा म्हणजे संस्कृती, विचारांची परंपरा आणि समाजाच्या आत्म्याचा आवाज! प्रत्येक भाषेचा त्याचा एक इतिहास असतो आणि तसाच प्रभाव समाजावर दिसून येतो. अशी कित्येक हजारो वर्षे प्राचीन भाषा म्हणजे संस्कृत भाषा; हजारो वर्षांपूर्वी पासून असलेल्या भारतीय संस्कृतीचा अभ्यास आपल्याला या अक्षरांमधून होतो. म्हणूनच संस्कृत भाषा हा जणू सगळ्या संस्कृतीच्या अभ्यासाचा आत्मा आहे. ही केवळ एक भाषा नसून भारताच्या ज्ञानपरंपरेचा, तत्त्वज्ञानाचा, साहित्याचा आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे.

श्रावण पौर्णिमा हा दिवस भारतीय संस्कृतीत अनेक अर्थांनी महत्त्वाचा मानला जातो. आणि याच दिवशी संस्कृत दिन साजरा करून जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध आणि शास्त्रीय भाषांपैकी एक असलेल्या संस्कृत भाषेचा गौरव केला जातो.

आजचा काळ कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाचा आहे. अशा वेळी अनेकांना संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा वाटते. पण प्राचीन असणे म्हणजे कालबाह्य असणे नाही. संस्कृतमध्ये केवळ धार्मिक ग्रंथ नाहीत; तर तत्त्वज्ञान, साहित्य, नाट्य, व्याकरण, गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, योग आणि नीतिशास्त्र यांचा अमूल्य ठेवा आहे. या ज्ञानाचा अभ्यास जितका वाढेल, तितके संस्कृतचे महत्त्वही वाढत जाईल. त्यामुळे संस्कृतचे भविष्य तिच्या भूतकाळात नसून, तिच्या ज्ञानसंपदेच्या रूपात दडलेले आहे.

**संस्कृत भाषा टिकली पाहिजे.**

कोणतीही भाषा जिवंत राहते ती तिच्या वापरामुळे, अभ्यासामुळे आणि तिच्याबद्दलच्या अभिमानामुळे. संस्कृतबाबतही हीच गोष्ट लागू होते.संस्कृत ही फक्त धार्मिक विधींपुरती मर्यादित भाषा नाही तर या भाषेने आपल्याला अफाट ज्ञानसागर दिला आहे. भारतीय तत्त्वज्ञान, योग, आयुर्वेद, गणित, व्याकरण, साहित्य, नाट्य, संगीत अशा असंख्य ज्ञानशाखांचा अमूल्य वारसा संस्कृतमधून जपला गेला आहे.संस्कृत ही भूतकाळात अडकलेली भाषा नसून भविष्याला दिशा देणारी एक विचारपरंपरा आहे म्हणूनच सर्वे भवन्तु सुखिनः किंवा वसुधैव कुटुंबकम् यांसारखी मूल्ये आजच्या जागतिक समाजालाही तितकीच सुसंगत वाटतात.

आजकाल आपल्या देशात अनेक भाषा शिकण्याची संधी उपलब्ध होतं आहे तेव्हा संस्कृत भाषा ही पण परीक्षेपुरती भाषा न राहता तिची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. संस्कृतचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर तिचे अध्यापन अधिक संवादात्मक, रंजक आणि आधुनिक करावे लागेल. डिजिटल माध्यमांवर संस्कृत साहित्य उपलब्ध करणे, भाषांतराला प्रोत्साहन देणे, संशोधन वाढवणे आणि नव्या पिढीला संस्कृतमधील विचारसंपदेची ओळख करून देणे आवश्यक आहे.घरात एखादा श्लोक समजून घेणे, सुभाषितांचा अर्थ जाणून घेणे किंवा संस्कृत साहित्य वाचण्याची आवड निर्माण करणे हे ही संस्कृत भविष्यात जतन करण्याचे पाऊल आहे.

संस्कृत दिन साजरा करताना केवळ श्लोकपठण किंवा भाषणे पुरेशी नाहीत. शाळांमध्ये संस्कृत साहित्याची गोडी निर्माण होणे, सुभाषितांमधील जीवनमूल्ये समजून घेणे, संशोधनाला चालना देणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संस्कृतचे ज्ञान अधिक लोकांपर्यंत पोहोचवणे, ही काळाची गरज आहे. संस्कृत दिनाचा उद्देश केवळ एक प्राचीन भाषा साजरी करणे नाही, तर हा दिवस औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता, संस्कृतमधील विचार, मूल्ये आणि ज्ञान आजच्या जीवनाशी जोडण्याची संधी म्हणून साजरा केला जायला हवा. संस्कृत भाषा ही केवळ भूतकाळाचा अवशेष नाही तर; भविष्याला दिशा देणारी ज्ञानपरंपरा आहे. म्हणूनच तिचे अस्तित्व जतन करून हा सांस्कृतिक वारसा उज्ज्वल करणे हा आपल्या संस्कृतीचा व जाणीवेचा सन्मान आहे.

**ॲड. स्वाती जेरे, नाशिक**

# भारत : एक अजिंक्य महासत्ता

भारत हा केवळ एक भूभाग नाही, तर १४० कोटी जनतेची अस्मिता आणि संस्कृतीचा जिवंत प्रवाह आहे. या महाकाय राष्ट्राच्या संरक्षणाची धुरा ज्यांच्या खांद्यावर आहे, ते म्हणजे आपले भारतीय सशस्त्र दल (Indian Armed Forces). जगातील सर्वात आव्हानात्मक सीमा, अथांग समुद्र आणि विशाल आकाश कवेत घेणारे आपले तिन्ही दल आज जगातील कोणत्याही संकटाला चक्काचूर करण्यास सक्षम आहेत. शत्रूच्या छातीत धडकी भरवणाऱ्या आपल्या तिन्ही दलांचे सामर्थ्य खालीलप्रमाणे आहे :

**१. भारतीय भूदल (Indian Army): 'सेवा परमो धर्म:'**

हिमालयाच्या उणे ५० अंश तापमानात देशाचे रक्षण करणारे आणि राजस्थानच्या धगधगत्या वाळवंटात शत्रूवर नजर ठेवून असणारे आपले भारतीय भूदल हे जगातील सर्वात मोठे आणि पराक्रमी 'स्वयंसेवी' सैन्य आहे. इथे कोणी बळजबरीने सैन्यात येत नाही, तर मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण पणाला लावण्याची जिद्द घेऊन तरुण सैन्यात भरती होतात.

- **शौर्य आणि संख्याबळ:** सुमारे १२.५ लाख सक्रिय सैनिक आणि ९ लाख राखीव सैनिकांची ही पोलादी भिंत आहे. कारगिल युद्ध असो वा सर्जिकल स्ट्राईक, भारतीय भूदलाने नेहमीच शत्रूला त्याची जागा दाखवून दिली आहे.
- **रणगाड्यांची अभेद्य भिंत:** भारताकडे T-90 भीष्म आणि T-72 अजया सारखे ४,००० हून अधिक शक्तिशाली रणगाडे आहेत. तसेच संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानाने बनवलेला 'अर्जुन' (Arjun MBT) रणगाडा शत्रूच्या छावण्या उद्ध्वस्त करण्यासाठी सदैव सज्ज असतो.
- **तोफखान्याची गडगडाट (Artillery):** 'के-९ वज्र' (K9 Vajra) ही स्वयंचलित तोफ आणि बोफोर्सची आधुनिक आवृत्ती असलेली स्वदेशी 'धनुष' तोफ, शत्रूवर आगीचा वर्षाव करण्यासाठी ओळखली जाते.
- **जगातील एकमेव 'हाय-अल्टिट्यूड' एक्स्पर्ट:** सियाचीन सारख्या जगातील सर्वात उंच युद्धभूमीवर जिवंत राहणे आणि लढणे यात भारतीय सैन्याचा हात जगात कोणीही धरू शकत नाही. अमेरिकेसारखे देशही आपल्या सैनिकांकडून पर्वतीय युद्धाचे (Mountain Warfare) धडे घेतात.

**२. भारतीय वायुदल (Indian Air Force): 'नभः स्पृशं दीप्तम्' (आकाशाला अभिमानाने स्पर्श करा)**

भारतीय वायुदल हे जगात चौथ्या क्रमांकाचे सर्वात मोठे आणि शक्तिशाली वायुदल आहे. आकाशात झेप घेणारे आपले फायटर जेट्स हे देशाच्या सार्वभौमत्वाचे कवच आहेत.

- **आकाशातील शिकारी (लढाऊ विमाने):** आपल्या ताफ्यात फ्रान्सची अत्याधुनिक राफेल (Rafale) विमाने आहेत, जी हवेतून हवेत आणि हवेतून जमिनीवर अचूक मारा करण्यात जगात सर्वोत्तम मानली जातात. यासोबतच रशियन बनावटीची सुखोई-३० एमकेआय (Su-30 MKI) ही आकाशातील 'फ्लाइंग मशीन' आणि संपूर्ण स्वदेशी बनावटीचे तेजस (LCA Tejas) हे भारताच्या आत्मनिर्भतेचे प्रतीक बनले आहे.
- **अभिनव 'रडार' आणि वायु संरक्षण:** भारताकडे S-400 ट्रायम्फ ही जगातील सर्वात प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आहे. ही यंत्रणा ४०० किलोमीटर दूर असलेल्या शत्रूच्या विमानाला किंवा क्षेपणास्त्राला हवेतच नष्ट करू शकते. भारताच्या आकाशाकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याचा वध निश्चित आहे.
- **ब्रह्मोस (BrahMos) चा थरकाप :** जगातील सर्वात वेगवान सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र 'ब्रह्मोस' जेव्हा सुखोई विमानावरून डागले जाते, तेव्हा शत्रूला पळायलाही जागा उरत नाही.

३. **भारतीय नौदल (Indian Navy) :** 'शं नो वरुणः' (पाण्याचा देव वरुण आमचे कल्याण करो)

हिंद महासागराचा अनभिषिक्त सम्राट म्हणजे आपले भारतीय नौदल. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि संपूर्ण हिंद महासागरावर भारताची घारीसारखी नजर असते.

- समुद्रावर तरंगते किल्ले (Aircraft Carriers): भारताकडे आयएनएस विक्रमादित्य (INS Vikramaditya) आणि भारताची स्वतःची निर्मिती असलेली आयएनएस विक्रांत (INS Vikrant) या दोन भव्य विमानवाहू नौका आहेत. या नौका म्हणजे समुद्रात तरंगते लष्करी तळच आहेत, ज्यावरून एकाच वेळी अनेक लढाऊ विमाने उड्डाण करू शकतात.
- पाण्याखालील गुप्त काळ (Nuclear Submarines): भारताकडे आयएनएस अरिहंत (INS -rihant) आणि आयएनएस अरिघात यांसारख्या अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या आहेत. या पाणबुड्या कित्येक महिने समुद्राच्या तळाशी राहून शत्रूच्या जहाजांचा वेध घेऊ शकतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यावरून अण्वस्त्रांचा मारा केला जाऊ शकतो.
- स्टेल्थ विनाशिका (Destroyers): 'विशाखापट्टणम' आणि 'कोलकाता' श्रेणीतील युद्धनौका शत्रूच्या रडारला चकवा देण्यात पटाईत आहेत. आधुनिक नौदल हे केवळ संरक्षण करत नाही, तर आशिया-पॅसिफिक क्षेत्रात शांतता राखणारा सर्वात मोठा दूत ठरले आहे.

**आत्मनिर्भर भारत: शस्त्रास्त्रांचे परावलंबित्व संपले!**

पूर्वी भारत शस्त्रांसाठी इतर देशांवर अवलंबून असायला लागायचा, पण आज 'मेक इन इंडिया' मुळे चित्र बदलले आहे.

- अग्नी-५ (Agni-V): ५,००० किलोमीटरहून अधिक अंतरावरील शत्रूचा वेध घेणारे हे आंतरखंडीय क्षेपणास्त्र भारताच्या वैज्ञानिक आणि लष्करी ताकदीचा सर्वात मोठा हुकमी एक्का आहे.
- आज भारत स्वतःची लढाऊ विमाने, स्वतःच्या पाणबुड्या, स्वतःची क्षेपणास्त्रे आणि स्वतःचे रडार तयार करत आहे. आता आपण केवळ शस्त्र खरेदीदार देश राहिलो नसून, जगाला शस्त्रास्त्रांची निर्यात करणारा देश बनत आहोत.
- **अभिमानास्पद निष्कर्ष:**

आपल्या भारतभूमीचे रक्षण करणाऱ्या तीनही दलांचे सामर्थ्य केवळ शस्त्रांवर नाही, तर प्रत्येक सैनिकाच्या नसानसात वाहणाऱ्या देशभक्तीवर आणि असीम शौर्यावर टिकून आहे.

देशाच्या सीमेवर अहोरात्र डोळ्यात तेल घालून पहारा देणाऱ्या आणि तिरंग्याची शान राखण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या आपल्या वीर जवानांना मानाचा मुजरा!

**भारत माता की जय! वंदे मातरम!**

**श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी**


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**



**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# भारतीय आर्थिक क्रांतीचे एक तप

गेले दशक (२०१४ ते २०२६) भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतिहासात अत्यंत क्रांतिकारी आणि ऐतिहासिक ठरले आहे. २०१४ मध्ये जगातील पहिल्या दहा अर्थव्यवस्थांमध्ये चाचपडणारा भारत आज जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असून, लवकरच तिसऱ्या स्थानावर झेप घेण्यासाठी सज्ज आहे. हा प्रवास केवळ आकड्यांमधील वाढ नाही, तर देशाच्या आर्थिक रचनेचे झालेले 'स्ट्रक्चरल ट्रान्सफॉर्मेशन्स' (रचनात्मक बदल) आहे. तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, करप्रणाली आणि सर्वसमावेशक विकास या चतुःसूत्रीच्या बळावर भारतात गेल्या १० वर्षांत एक अभूतपूर्व आर्थिक क्रांती घडून आली आहे.

या आर्थिक क्रांतीचे प्रमुख पैलू आणि टप्पे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील:

### १. डिजिटल क्रांती आणि 'FinTech' चा उदय

भारताच्या आर्थिक क्रांतीचा सर्वात मोठा कणा म्हणजे 'डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर' (DPI) होय. मग JAM त्रिसूत्री (जनधन खाती, आधार आणि मोबाईल) मुळे देशातील कोट्यवधी नागरिक थेट बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले.

- UPI **(युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस): आज भारतात भाजी विक्रेत्यापासून ते मोठ्या मॉलपर्यंत डिजिटल व्यवहार केले जातात. जगातील एकूण रिअल-टाइम डिजिटल व्यवहारांपैकी जवळपास ४६% व्यवहार एकट्या भारतात होतात. (१)**
- **थेट लाभ हस्तांतरण (DBT)**: सरकारी योजनांचा पैसा थेट गरिबांच्या बँक खात्यात जमा होऊ लागल्यामुळे भ्रष्टाचाराला चाप बसला आणि सरकारी निधीचा अपव्यय थांबला. पीएम-किसान योजनेसारख्या अनेक योजना याद्वारे यशस्वी झाल्या आहेत.

### २. 'जीएसटी' (GST) - एकात्मिक बाजारपेठेची निर्मिती

२०१७ मध्ये लागू करण्यात आलेली 'वस्तू आणि सेवा कर' (GST) प्रणाली हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा कर सुधारणा टप्पा ठरला. 'एक देश, एक कर, एक बाजारपेठ' या संकल्पनेमुळे राज्याराज्यांमधील करांच्या भिंती पाडल्या गेल्या. यामुळे उद्योग करणे सोपे झाले (Ease of Doing Business) आणि लॉजिस्टिक क्षेत्राचा वेग वाढला. सध्या देशाचे मासिक जीएसटी संकलन सरासरी १.७ लाख कोटींच्या पार गेले आहे, जे देशाच्या मजबूत अंतर्गत मागणीचे आणि वाढत्या औपचारिक अर्थव्यवस्थेचे (Formalisation of Economy) द्योतक आहे.

### ३. पायाभूत सुविधांचा (Infrastructure) सुवर्णकाळ

गेल्या १० वर्षांत भारताने पायाभूत सुविधांवर केलेला भांडवली खर्च (Capex) जवळपास ५ पटीने वाढवला आहे. पायाभूत सुविधांचा हा वेग देशाच्या आर्थिक प्रगतीला गती देत आहे:

- **रस्ते आणि महामार्ग :** 'भारत' content आणि राष्ट्रीय महामार्गांचे जाळे गतीने विस्तारले आहे. २०१४ मधील हाय-स्पीड कॉरिडोर्स ५५० किमीवरून वाढून २०२६ पर्यंत ५,३०० किमीच्या पार गेले आहेत.
- **रेल्वे आणि विमान वाहतूक :** 'वंदे भारत' सारख्या अत्याधुनिक सेमी-हायस्पीड गाड्या आणि 'उडान' (UDAN) योजनेमुळे प्रादेशिक विमान प्रवास सर्वसामान्यांच्या आवाक्यात आला आहे. देशातील विमानतळांची संख्या ७४ वरून १६० च्या पार गेली आहे.

### ४. 'मेक इन इंडिया' आणि स्टार्टअप परिसंस्था

भारताला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्यासाठी सुरू केलेल्या 'मेक इन इंडिया' आणि 'PLI' (उत्पादनावर आधारित प्रोत्साहन) योजनांचे मोठे फळ देशाला मिळाले आहे.

- **मोबाईल उत्पादन:** २०१४ मध्ये भारत मोबाईल आयात करत होता, तर आज भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक देश बनला असून अब्जावधी डॉलर्सचे फोन निर्यात करत आहे. तसेच संरक्षण उत्पादनात

(Defence Production) भारताने स्वावलंबन मिळवत ३८,००० कोटींपेक्षा जास्त मूल्याची संरक्षण निर्यात नोंदवली आहे.

- **स्टार्टअप्सची झेप:** दशकभरापूर्वी देशात हाताने मोजण्याइतके स्टार्टअप्स होते, आज ती संख्या १.५ लाखांच्या पुढे गेली असून भारत जगात तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था (Startup Ecosystem) बनला आहे.

### ५. बँकिंग क्षेत्राचा कायापालट आणि मजबूत परकीय चलन साठा

२०१४ च्या सुमारास भारतीय बँकिंग व्यवस्था 'NPA' (बुडीत कर्जे) च्या संकटाने ग्रासलेली होती. मात्र, 'इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी कोड' (IBC) आणि बँकांचे विलीनीकरण यांसारख्या कठोर निर्णयांमुळे आज भारतीय बँकिंग क्षेत्र जगातील सर्वात मजबूत व सुरक्षित मानले जाते. बँकांचा एनपीए लक्षणीय घटला आहे. त्याच वेळी, भारताचा परकीय चलन साठा (Foreign Exchange Reserves) ७०० अब्ज डॉलर्सचा टप्पा पार करून ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचला आहे, ज्यामुळे जागतिक आर्थिक मंदीच्या काळातही भारताची अर्थव्यवस्था स्थिर राहिली.

### ६. सर्वसमावेशक विकास आणि दारिद्र्य निर्मूलन

या आर्थिक क्रांतीचा सर्वात मानवी आणि महत्त्वाचा चेहरा म्हणजे गरिबांचे आर्थिक सक्षमीकरण. निती आयोगाच्या आणि जागतिक अहवालानुसार, गेल्या १० वर्षांत भारताने २५ कोटींहून अधिक लोकांना बहुआयामी गरिबीतून (Multidimensional Poverty) बाहेर काढले आहे.

- 'प्रधानमंत्री आवास योजना', 'उज्ज्वला योजना' (गॅस जोडणी), 'जल जीवन मिशन' (नळाने पाणी) आणि 'आयुष्मान भारत' (आरोग्य विमा) या योजनांनी तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावले. जेव्हा लोकांची मूलभूत संकटांमधून सुटका होते, तेव्हा त्यांची आर्थिक उत्पादकता वाढते, हाच नियम या १० वर्षांत अधोरेखित झाला.

- **निष्कर्ष आणि भविष्यातील वेध**

गेल्या १० वर्षांतील भारताची आर्थिक क्राति‍ी ही केवळ सरकारी धोरणांपुरती मर्यादित नसून, ती देशातील तरुण, उद्योजक आणि तंत्रज्ञांच्या महत्त्वाकांक्षेचे फलित आहे. कोरोना महामारी, जागतिक युद्धजन्य परिस्थिती आणि महागाईचे संकट असतानाही भारताने सातत्याने ७% च्या आसपास आर्थिक वृद्धी दर (GDP Growth) राखला आहे. २०२५ मध्ये प्रमुख जागतिक क्रेडिट रेटिंग एजन्सींनी (जसे की SP) भारताचे रेटिंग अपग्रेड केले, जे देशाच्या आर्थिक धोरणांचे यश दर्शवते.

अर्थात, वाढती लोकसंख्या लक्षात घेता रोजगार निर्मिती वाढवणे, कृषी क्षेत्राची उत्पादकता सुधारणे आणि हवामान बदलाचा सामना करणे ही आव्हाने भारतासमोर अजूनही आहेत. परंतु, गेल्या दशकात रचलेला भक्कम पाया पाहता, भारत २०४७ पर्यंत मविकसित भारतफ बनण्याच्या उद्दिष्टाकडे अत्यंत आत्मविश्वासाने आणि वेगाने वाटचाल करत आहे, यात शंका नाही.

- **संदर्भ :**


1. https://economictimes.indiatimes.com/news/politics-and-nation/narendra-modi-12-years-achievements-india-reforms-gst-upi-article370-ram-mandir/articleshow/131634003.c ms?f rom=md r#:~:text=By% 202025% 2C% 20India% 20accounted% 20for, distribution% 20and% 20farmer% 20welfare%20schemes.
2. https://usanasfoundation.com/12-years-of-governance-key-achievements-of-the-modi-government#:~:text=Defence%2 0Exports% 20Value% 3A,increase% 20over% 20the% 20previous% 20fiscal
3. https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID= 2219907&reg= 48&lang=2#:~: text=A% 20significant%20im provement% 20has% 20been, and% 20 record% 20low% 20level% 2C% 20respectively.& text= INDIA'S% 20FOREIGN% 20EXCHANGE% 20RESERVES% 20INCREASE, CENT% 20FOR%20APRIL%2DDECEMBER% 2C%202025



**सौ. मयुरी श्रीपाद रामदासी**


◈ ◈ ◈

# आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...

**चारचाकी...**
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
**जनसेवा कर्ज !**






आपल्या आवडत्या
**टू व्हिलरसाठी**
किफायती
**कर्ज फक्त जनसेवेचे !**

स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
**स्वत:चे घर,**
ठेवा विश्वास
**जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !**





**करा जगाची सफर !**
**जनसेवा आहे हमसफर !**

**जनसेवा पर्यटन कर्ज**

• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी

**संपर्क : 8485871252**
www.janasevabankpune.bank.in

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय :**
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/07/2026 and
Date of Posting : 28/07/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'**.

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

0000

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१